# 24 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

ज्या दिवशी यंत्र विचार करू लागेल त्या दिवशी माणूस संपलेला असेल !

**आजचे पंचांग :**

वार – गुरुवार

दिनांक : 24 फेब्रुवारी 2022

मास – माघ

नक्षत्र – अनुराधा

सुर्योदय – सकाळी 6.55 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6. 38 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1938 ला जगातील पहिला नायलॉन टूथब्रश व्यवसायाला सुरुवात झाली.

1961 ला मद्रास राज्याला तामिळनाडू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Danger – धोकादायक 2) Date - तारीख 3) Death – मृत्यू 4) Dig – खणणे

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) गवत खाणाऱ्या प्राण्यांची नावे सांगा.

2) वनस्पतीपासून मिळणारे आहार पदार्थांची नावे सांगा.

3) चौरसाचे क्षेत्रफळ काढण्याचे सूत्र काय आहे?

4) भारताच्या दक्षिणेला कोणता समुद्र आहे?

बोधकथा :

## “लांडगा आला रे आला” ओरडणारा मुलगा

एकदा एका मेंढपाळाने आपल्या मुलाला सांगितले कि, “ आता तू मोठा झाला आहेस, मेंढ्यांकडे लक्ष देत जा” मेंढ्या धष्टपुष्ट आणि जाड लोकर देण्याजोगत्या होण्यासाठी, मेंढपाळाच्या मुलाला दररोज मेंढ्या माळरानावर चरायला घेऊन जाव्या लागत असत आणि त्यांच्यावर लक्ष ठेवायला लागत असे. त्याला खेळायला खूप आवडायचे, आणि मेंढ्याकडे लक्ष देण्याचे काम त्याला कंटाळवाणे वाटायचे. तेव्हा त्याने मजा करायचे ठरवले. तो जोरात ओरडला, “लांडगा आला रे आला!” लांडग्याने मेंढ्या खाऊन टाकू नये म्हणून सगळे गावकरी हातात दगड घेऊन धावत आले. तेव्हा त्यांनी पहिले कि तिथे लांडगा नव्हता, तेंव्हा सगळे गावकरी मुलाने फसवल्यामुळे चिडून तिथून निघून गेले. दुसऱ्या दिवशी मुलगा पुन्हा ओरडला, “लांडगा आला रे आला!” आणि लांडग्याला हाकलण्यासाठी गावकरी पुन्हा धावून गेले. आपण कशी दहशत निर्माण केली हे बघून मुलगा हसला, गावकरी पुन्हा तिथून निघून गेले. काही खूप संतप्त झाले. तिसऱ्या दिवशी जेव्हा मुलगा टेकडीवर गेला, त्याने अचानक लंगड्याला मेंढ्यावर हल्ला करताना पहिले. तो खूप मोठ्याने ओरडला, “लांडगा आला रे आला!” . पण गावकर्यांनी विचार केला कि तो पुन्हा आपल्याला मूर्ख बनवण्याचा प्रयत्न करतो आहे, आणि मेंढ्याची सुटका करण्यासाठी कुणीही आले नाही. त्या दिवशी लहान मुलाने तीन मेंढ्या गमावल्या, केवळ तो तीन वेळा “लांडगा आला रे आला!” असे ओरडल्यामुळेच.

तात्पर्य – लक्ष वेधण्यासाठी कथा तयार करू नका. जेव्हा आपल्याला खरोखर गरज असते तेव्हा कुणीही मदत करणार नाही.